


दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २४८
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शनिवार, दि.१९ एप्रिल २०२५







# ‘नॅशनल हेराल्ड’वरून पुण्यात राडा!

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, पुणे :** नॅशनल हेराल्ड प्रकरणात ईडीने काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि खासदार राहुल गांधी यांच्या विरोधात चार्जशीट दाखल केल्यानंतर देशभरात राजकारण तापू लागले आहे. एकीकडे ईडीच्या या चार्जशीटविरोधात काँग्रेसने आक्रमक भूमिका घेतली असतानाच आज पुण्यामध्ये भाजपनेही आंदोलन केले. यावेळी काँग्रेस अन् भाजप कार्यकर्ते आमने-सामने आल्याचे पाहायला मिळाले.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, नॅशनल हेराल्ड प्रकरणात काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी यांचे नाव आल्यानंतर काँग्रेस कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी यांना नोटीस आल्यानंतर खडकी रेल्वे स्थानकात युवक काँग्रेसकडून रेल्वे रुळावर आंदोलन करण्यात आले यावेळी युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी पुणे-लोणावळ लोकल अडवून धरली.



अशातच आज पुण्यामध्ये काँग्रेस भवनाच्यासमोर भाजप युवा मोर्चाकडून आंदोलन करण्यात आले. यावेळी भाजप कार्यकर्ते हे पुण्यातील काँग्रेस भवनावर धडकणार होते. सोनिया गांधी- राहुल गांधी यांना अटक करा अशा घोषणा करत काँग्रेस भवनामध्ये आम्ही जाणारच.. असा आक्रमक पवित्रा भाजपच्या आंदोलकांनी घेतला.

दुसरीकडे काँग्रेसनेही भाजपच्या आंदोलनाला प्रत्यूत्तर म्हणून लाठ्याकाठ्या घेऊन काँग्रेस भवनासमोर ठाण मांडले. त्यामुळे परिसरात मोठा तणाव झाल्याचे पाहायला मिळाले.

यावेळी पोलिसांनी हस्तक्षेप करत भाजप कार्यकर्त्यांची धरपकड केली. त्यामुळे पुण्यातील बालगंधर्व चौकात मोठ्या प्रमाणामध्ये गोंधळ झाल्याचे पाहायला मिळाले. दरम्यान, भाजपच्या या आंदोलनानंतर काँग्रेस कार्यकर्त्यांनीही आक्रमक भूमिका घेत भाजप कार्यालयावर आंदोलनाची तयारी केली. त्यामुळे पुन्हा एकदा दोन्ही पक्षाचे कार्यकर्ते आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले.

दरम्यान, नॅशनल हेरॉल्ड प्रकरणी ईडीने सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्याविरोधात चालवलेल्या कारवाईच्या निषेधार्थ आज काँग्रेसने निदर्शने केली. ही कारवाई मोदी सरकार सूडबुद्धीने करीत असून, देशातील ज्वलंत प्रश्नांकडे लोकांचे लक्ष जाऊ नये, यासाठी हे सगळे कारस्थान रचले जात आहे. त्याचा निषेध करण्यासाठी आम्ही हे आंदोलन करीत असल्याचे काँग्रेस नेत्यांनी सांगितले.

## थोडक्यात

### मुंबई-नागपूर अवघ्या ८ तासात !



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, नाशिक :** समृद्धी महामार्गाच्या शेवटच्या टप्प्याचे काम लवकरच पूर्ण होणार आहे. शेवटचा टप्पा लवकरच नागरिकांसाठी खुला करण्यात येणार आहे. भिवंडी आणि इगतपुरी दरम्यानच्या शेवटच्या ७६ किमीच्या टप्प्याचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होण्याची शक्यता आहे. येत्या २ मे रोजी तिसऱ्या टप्प्याचे लोकार्पण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. ढजख याबाबतचं वृत्त प्रसिद्ध केलं आहे.

**मुंबई-नाशिक अंतर कमी होणार**

समृद्धी महामार्गाच्या तिसऱ्या टप्पा सुरु झाल्यानंतर मुंबई-नाशिक अंतर देखील एका तासाने कमी होणार आहे. तर मुंबईहून नाशिक अवघ्या ८ तासात पोहोचता येणार आहे. ७०१ किमीचा हा संपूर्ण हाय-स्पीड कॉरिडॉर मुंबई, नाशिक आणि नागपूरला जोडतो.

भिवंडीतील इगतपुरी आणि आमणे गावादरम्यानचा समृद्धी महामार्गाचा शेवटचा भाग हा सह्याद्रीच्या खडकाळ भूप्रदेशातून जातो. डोंगरांचा खडकाळ भाग, दऱ्या-खोऱ्यावर पूल बांधली, बोगदे तयार करणे असा सर्वात आव्हानात्मक हा तिसरा टप्पा आहे.

**तिसऱ्या टप्प्याची वैशिष्टे**

समृद्धी महामार्गावरील तिसऱ्या टप्प्यात ५ बोगद्यांचा समावेश आहे. याची एकत्रित लांबी ११ किमी आहे. इगतपुरीचा बोगदा ८ किमीचा असून जगातील सर्वात रुंद बोगदा आहे. यामुळे कसारा घाटाचे अंतर २५ मिनिटांवरून ८ मिनिटांवर येणार आहे. बोगद्यात अत्याधुनिक अग्निशमन यंत्रणा बसवण्यात आली आहे.

**१० जिल्ह्यांतून जाणार महामार्ग**

समृद्धी महामार्ग नागपूर, वर्धा, अमरावती, वाशिम, बुलढाणा, जालना, औरंगाबाद, नाशिक, अहमदनगर, ठाणे या जिल्ह्यांमधून जातो. समृद्धी महामार्गावर जवळपास ५० उड्डाणपूल, ५ बोगदे, ३०० वाहनांसाठीचे अंडरपास आणि ४०० पादचारी अंडरपास यांचा समावेश आहेत.

### मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर मोठी वाहतूक कोंडी वाहनांच्या लांबच लांब रांगा...



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, मुंबई :** मुंबई-पुणे एक्सप्रेस वे वर पुण्याकडे जाणाऱ्या मार्गांवर मोठी वाहतूक कोंडी पाहायला मिळत आहे. सलग तीन दिवस सुट्ट्यामुळे मुंबई, ठाणे, नवीमुंबई येथून मोठ्या प्रमाणात नागरिक बाहेर निघाले आहेत. तर काही ठिकाणी शाळांच्या सुट्ट्या सुरु झाल्या असून अनेकजण गावी निघाले असल्याने वाहने मोठ्या प्रमाणात रस्त्यावर आली आहेत.

खंडाळा टनेलमधून दोन्ही मार्गांवर मुंबईकडे येणाऱ्या मार्गांवर व पुण्याकडे जाणाऱ्या मार्गांवर एकाच मार्गाची पुण्याकडे जाणारी वाहतूक सुरु आहे. खंडाळ्यातून मुंबईकडे येणारी वाहतूक एक्सप्रेस वे वर थांबवण्यात आल्याने खंडाळा परिसरात वाहनांच्या रांगा पाहायला मिळत आहेत.

खंडाळा टनेलमधून दोन्ही मार्गांवर पुण्याकडे जाणारी वाहतूक सुरु केली आहे. तर मुंबईकडे जाणारी वाहतूक रोखून वाहतूक कोंडी दूर करण्याचा प्रयत्न पोलिसांकडून केला जात आहे. सकाळपासून पोलीस महामार्गावर उपस्थित असून लवकरच वाहतूक सुरळीत होईल, असं पोलीस म्हणाले.

# धाराशिव शहरातील कचरा डेपोमुळे आरोग्य धोक्यात !

## नगर परिषदेचा नागरिकांच्या जीविताशी खेळ...

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.१८, धाराशिव :** धाराशिव शहरातील कचरा डेपोमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. सतत कचऱ्याचा दुर्गंधीयुक्त धूर शहराच्या विविध भागांत पसरत असल्याने आबालवृद्धांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याशी होत असलेला खेळ थांबवून हा कचरा डेपो इतरत्र हलवावा यासाठी २८ एप्रिलपासून आमरण उपोषण करणार असल्याचे निवेदन युवा सेनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

गुरुवारी दि. १७ युवा सेनेचे शहरप्रमुख रवि वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली मागणीचे निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले की, शहरातील उचलण्यात येणारा कचरा हा शहरालगतच्या कचरा डेपो येथे टाकण्यात येतो. गेल्या काही महिन्यांपासून या कचरा डेपोमधून सतत धूर निघून तो परिसरातील लोकवस्ती असलेल्या भागात पसरत आहे. या धुरामुळे व दुर्गंधीमुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. धुरामुळे अनेकांच्या डोळ्यांना त्रास होत




आहे. तसेच श्वसनाचाही अनेकांना त्रास सहन करावा लागत आहे. धुरामुळे डोळ्यांचे व श्वसनाचे विकार जडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सततच्या धुरामुळे उमर मोहल्ला, ख्वाजानगर, गणेशनगर, दर्गाह रोड, तालीम गल्ली, बस डेपो परिसर, आयुर्वेद महाविद्यालय परिसर, अहिल्यादेवी होळकर चौक, आगड गल्ली भागांतील नागरिकांना सध्या या धुराचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. नगरपरिषदेच्या गलथान कारभाराचा फटका नागरिकांना सहन करावा लागत आहे.

या कचरा डेपोत दररोज जमा होत असलेल्या कचऱ्याचे विलगीकरण करावे. ओला व सुका कचरा वेगळा करावा. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने या कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावावी. कचऱ्यावर योग्य प्रक्रिया व कचऱ्याचे विलगीकरण करावे. कचऱ्यावर प्रक्रिया करून त्याची योग्य ती विल्हेवाट लावणे शक्य नसेल तर हा कचरा डेपो इतरत्र हलवून परिसरातील नागरिकांचे आरोग्य अबाधित राखावे, यासाठी संबंधित यंत्रणेला योग्य ते आदेश द्यावेत, अशी विनंती करणारे निवेदन नागरिकांच्या वतीने यापूर्वीही देण्यात आलेले आहे. तरीही अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही. शहरातील नागरिकांच्या आरोग्याचा विचार करून तातडीने यावर उपाययोजना करावी, अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर २८ एप्रिल २०२५ पासून आमरण उपोषण करण्यात येईल, असे निवेदनात नमूद केले आहे.

निवेदनावर युवा सेनेचे शहरप्रमुख रवि वाघमारे, प्रवीण कोकाटे, प्रदीप मुंडे, सोमनाथ गुरव, बाळासाहेब काकडे, पांडू भोसले, गणेश खोचरे, राणा बनसोडे, राज निकम, गणेश बंडगर, बंडू आदरकर, विनोद केजकर, जगदीश माने, सुनील वाघ, दिलीप महाजन, साबेर सय्यद, शाहबाज पठाण, नितीन राठोड, अभिराज कदम, बाळासाहेब गुंडाळे, महेश गंगणे, गजेंद्र शेरकर, महेश शेरकर, बालाजी शेरकर, कैलास शेरकर, प्रदीप साळुंके, दिलीप डोंगे, महेश शिंदे, प्रसाद तेरकर, मुजीब काझी, अमित कोकाटे, प्रदीप तेरकर, हनुमंत यादव, प्रसाद पांढरे, राहुल चव्हाण, सुनील परसे, सलीम पठाण, बाबासाहेब सावळे, अभिजित कोळी, कृष्णा आकोसकर, अविनाश इटकर, ज्ञानेश्वर ढेकणे, मनोज जाधव, रणजित दाभाडे, प्रमोद पाटील, कुणाल जानराव, पवन राऊत, निलेश साळुंके, नागेश गाडे, प्रदीप पोतदार, सुरज लोंढे, आकाश इंगळे, प्रकाश डांगे, नितीन राठोड आदींची स्वाक्षरी आहे.

# मौलानाच्या खून प्रकरणाचा पर्दाफाश – मृतदेह हाडांच्या स्वरूपात सापडला...

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१८, ठाणे :** ५ वर्षांपूर्वी भिवंडी येथून अपहरण करण्यात आलेल्या अल्पवयीन मुलाचा खून केल्याचा धक्कादायक खुलासा ठाणे शहर गुन्हे शाखेच्या मालमत्ता गुन्हे कक्षाने केला आहे. या प्रकरणात आरोपी गुलाब उर्फ गुलाम रब्बानी शेख (पूर्वीचा मौलाना) याला उत्तराखंड येथून अटक करण्यात आली असून, त्याने अपहृत मुलाचा खून करून मृतदेह किराणा दुकानाच्या शेजारील गाळ्यात पुरल्याची कबुली दिली आहे.

दि. २० नोव्हेंबर २०२० रोजी नेहरूनगर, नवीवस्ती, भिवंडी येथून शोएब रशिद शेख (वय १६ वर्षे) या अल्पवयीन मुलाचे अपहरण झाल्याची तक्रार भिवंडी शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती. या प्रकरणी गु.र.नं. ३८५/२०२० भादंवि कलम ३६३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर आरोपीविरुद्ध भिवंडी शहर पोलीस ठाण्यात गु.र.नं. २३/२०२३ भादंवि कलम ३७७ तसेच पोक्सो कायदा कलम ८ व १२ अंतर्गत गुन्हा दाखल असून तो गेल्या अनेक महिन्यांपासून फरार होता. मालमत्ता गुन्हे



शाखेकडून या दोन्ही गुन्ह्यांचा समांतर तपास सुरू होता.

पोलीस नाईक सचिन कोळी यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, आरोपी उत्तराखंडमधील रूडकी जवळील मुक्कमपूर येथील मशिदीत लपून राहत असल्याचे समजल्यावर पोलिसांनी तांत्रिक तपास करून त्याला ताब्यात घेतले आणि ठाण्यात आणले. तपासादरम्यान आरोपीने कबुली दिली की, त्याने अपहृत मुलाचा खून करून मृतदेह स्वतःच्या किराणा दुकानाच्या बाजूच्या गाळ्यातील बाथरूममध्ये पुरला होता. पोलिस, तहसीलदार, फॉरेन्सिक व वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बाथरूममधील टाईल्स खोदल्यावर मानवी हाडांचे अवशेष सापडले. या अवशेषांना अधिक तपासासाठी रासायनिक विश्लेषण प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहे.

सदर आरोपीस भिवंडी न्यायालयाने १९ एप्रिल २०२५ पर्यंत पोलिस कोठडी सुनावली असून त्याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याचा तपास मालमत्ता गुन्हे कक्ष, गुन्हे शाखा, ठाणे शहर करत आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त अमरसिंह जाधव, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त विनय घोरपडे यांचे मार्गदर्शनाखाली मालमत्ता गुन्हे कक्ष, गुन्हे शाखा, ठाणे शहर कक्षाकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ घार्गे, सपोनि / अब्दुल मलीक, सपोउपनि / शिवाजी गायकवाड, सपोउनि / नगराज रोकडे, पोहवा/ दिनेश्न कुंभारे, पोहवा/प्रशंत भुर्के, पोहवा / जयकर जाधव, पोहवा / संदीप भांगरे, पोहवा / महेश साबळे, पोहवा/मुकुंद आव्हाड, पोहवा / महेश्न राजपुत, मपोहवा / अश्शा गोळे, पोना/सचिन कोळी, मपोना/ गिताली पाटील, पोअं / महेश सावंत, पोअं. / अशोक पाटील, व चापोअं/ सदन मुळे यांनी केलेली आहे.

# संपादकीय



## उत्क्रांतीवादाचा जनक

उत्क्रांती वादाचा जनक असे ज्यांना समजले जाते त्या चार्ल्स रॉबर्ट डार्विन यांचा आज स्मृतिदिन. १९ एप्रिल १८८२ रोजी त्यांचे निधन झाले होते. चार्ल्स डार्विन हे विख्यात जीवशास्त्रज्ञ होते. त्यांनी मांडलेल्या उत्क्रांतीवादाच्या सिद्धांतात जगातील जीवसृष्टीची उत्पत्ती व विकासाची कशी प्रगती होत गेली हे शास्त्रशुद्धरित्या उलगडून दाखवले. चार्ल्स डार्विन यांचा जन्म १२ फब्रुवारी १८०९ रोजी इंग्लंडमधील श्रॉपशायर परगण्यात झाला.त्यांचे वडील रॉबर्ट डॉक्टर तर आजोबा इमर्सन शास्त्रज्ञ होते. शालेय जीवनात त्यांना रसायन शास्त्राची खूप आवड होती म्हणून आपल्या भावाच्या मदतीने त्यांनी आपल्या घराबाहेर एक छोटीशी प्रयोगशाळा उभारली होती तिथे ते तासनतास प्रयोग करीत बसत. ते असे एकाच जागेवर तासनतास प्रयोग करीत बसत असल्याने मित्र मंडळी त्यांची नेहमी टर उडवत पण ते त्याकडे कायम दुर्लक्ष करीत. त्यांना निसर्गाचीही खूप आवड होती. पुढे त्यांची डॉ ग्रांट यांच्याशी ओळख झाली. डॉ ग्रांट हे स्वतः प्रसिद्ध जीव शास्त्रज्ञ होते. १८२५ मध्ये डार्विन यांनी केंब्रिज विद्यापीठाच्या क्राईस्ट महाविद्यालयात नाव नोंदवून पदवी मिळवली. तिथे त्यांना कीटक व निसर्गातील जीव जिवाणूंच्या निरीक्षणाचा नाद लागला. १८२६ मध्ये कॅप्टन किंगने दक्षिण अमेरिका संशोधनाची मोहीम आखली त्यात ते सहभागी झाले. त्या मोहिमेवर ते पाच वर्ष होते. तिथे त्यांनी निरनिराळे पक्षी, प्राणी, कीटक, जीवजंतू एकमेकांशी कसे वागतात. ते एकमेकांशी आणि निसर्गाशी कसे जुळवून घेतात याचे निरीक्षण व अभ्यास केला व तेथे उत्क्रांतीवाद, सहजीवन, बळी तो कान पिळी ही मूलभूत नैसर्गिक तत्वे ते शिकले. याच दरम्यान माणसाचा मूळ पुरुष, चार पायी माकडपासून झाला असला पाहिजे असा विचार त्यांच्या डोक्यात घुमू लागला. त्यांनी याचे खूप संशोधन केले. वेगवेगळे प्राणी कसे निर्माण झाले यासंदर्भातही त्यांनी खूप संशोधन केले. या संशोधनावर आधारित ओरिजन ऑफ स्पेसिस हा ग्रंथ त्यांनी लिहिला. या ग्रंथातच त्यांनी उत्क्रांतवादाचा सिद्धांत मांडला आहे. या ग्रंथाच्या १२५० प्रति एकाच दिवसात विकल्या गेल्या. या ग्रंथामुळे त्यांचे सर्वत्र त्यांचे नाव झाले. या ग्रंथात त्यांनी मांडलेला उत्क्रांतीवादाचा सिध्दांत बायबलच्या विरुद्ध जात होता म्हणून अनेकांनी या सिद्धांताला विरोध केला. हा सिद्धांत बायबलच्या विरुद्ध जातो म्हणून त्याचा निषेध करण्यासाठी १८६० मध्ये ऑक्सफर्डमध्ये विलबर फोर्स या बिशपने सभा बोलावली. डार्विन यांचा एकीकडे पुरोगामी विचारांचे लोक समर्थन करीत होते दुसरीकडे प्रतिगामी लोक विरोध करीत होते. पण या सर्व घडामोडींचा डार्विन यांच्यावर कोणताही परिणाम होत नव्हता त्यांचे संशोधन चालूच होते. बिशप डार्विनला कडाडून विरोध करीत असताना हक्सले डी हुकर हे शास्त्रज्ञ मात्र डार्विन यांची बाजू सडेतोड व सोदाहरण मांडत होते. त्यामुळे उत्क्रांतीवादाच्या सिद्धांताला कडाडून विरोध करणाऱ्या बिशपला अखेर माघार घेऊन डार्विनचा सिद्धांत मान्य करावाच लागला.

# जातीपेक्षा व धर्मापेक्षा मानवजात महत्त्वाची....



आजकाल प्रत्येकाला आपल्या जातीचा व धर्माचा खूप अभिमान वाटत आहे. आपल्या जातीसाठी माती खायला सुध्दा काही लोक तयार होत आहेत. काही काही जण तर आपल्या जातीसाठी व धर्मासाठी जीव अर्पण करायलाही मागेपुढे पाहत नाहीत. आपल्या जाती विरोधात जर कोणी अपशब्द वापरत असेल, तर अख्खा समाज रस्त्यावर उतरून त्याच्या विरोधात आंदोलने करत असतो. मोर्चे काढत असतो. म्हणजे आजकाल लोकांना आपल्या जातीचा, व धर्माचा खूप पुळका येत आहे.

धर्म माणसांसाठी नसून, माणूस धर्मासाठी झाला आहे, अशी कैक धर्मवेड्या लोकांची मानसिकता तयार झाली आहे. म्हणून लोक गावभर आपल्या जातीचा व धर्माचा टेंभा मिरवत आहेत. स्वतःच्या जातीला व धर्माला जिवापाड जपत आहेत. आपलीच जात सर्वांत श्रेष्ठ आहे असे मानत आहेत.आपल्याला कोणी जातीवाचक शिवीगाळ केली तर त्याची कल्लूयापासून जीभ कापण्यासाठी सज्ज होत आहेत. इतके जिवापाड महत्त्व आजकाल लोक आपल्या जातीला व धर्माला देत आहेत. आणि जातीपातीच्या खुळ्या बंधनात बंदिस्त होत आहेत. हा जातीचा व धर्माचा बोलबाला सध्या सर्वत्र चालू आहे. म्हणजे आपले भारतीय लोक आपल्या जातीला व धर्माला किती चिकटून बसले आहेत? हे आपल्याला कळते. काही महाभाग तर केवळ आपल्याच जातीच्या व धर्माच्या नेत्याला महत्त्व देत आहेत. त्यांच्यावर स्वतःचा जीव ओवाळून टाकत आहेत. आपलाच नेता लय भारी म्हणून त्यांना डोक्यावर घेत आहेत. तुम्ही त्यांना जरूर डोक्यावर घ्या. याला माझा काही विरोध नाही. पण इतर नेत्यांना व महापुरुषांना देखील तेवढेच महत्त्व द्या. कारण त्यांनी समस्त मानवजातीच्या भल्यासाठी व कल्याणासाठी आपले जीवन खर्ची घातले आहे. म्हणून इतर समाजाच्या नेत्यांना तुच्छ समजून त्यांची अवहेलना करण्याची घोडचूक कधीच करू नका.पण अशा धर्मांध लोकांना कोण सांगणार? की, आपल्या भारतीय महापुरुषांनी जाती व धर्माला महत्त्व न देता इथे प्रथम प्राधान्य माणसाला व मानवतेला दिले आहे. त्यांनी जाती व धर्माला न जुमानता समस्त बहुजन जनतेला मानवतेची व समतेची शिकवण दिली आहे. कोणत्याच महापुरुषाने स्वतःच्या जातीला उच्च समजून इतर जातीला पाण्यात पाहिले नाही. किंवा स्वतःच्या जातीला महत्त्व देऊन इतर जातीला तुच्छ समजले नाही. त्यांनी समस्त मानवजातीला सर्वधर्मसमभाव जपण्याची शिकवण दिली आहे.

मग ती महार जात असो, मांग असो, धनगर असो, मराठा असो की, मग ती ब्राह्मण असो किंवा इतर कोणती असो, या प्रत्येक जातीला आपल्या महापुरुषांनी समान व तेवढेच महत्त्व देऊन मानवता हिच जात मानून प्रत्येक जातीला एकाच पंगतीला बसवून भारतात समता व मानवता रुजवण्याचा प्रयत्न केला आहे. तर मग इथली माणसे आपल्याच जातीला व आपल्याच नेत्याला का महत्त्व देतात? आपल्याच जातीला इतर जातीपेक्षा वरचढ का मानतात? एवढे जातीचे भयानक खुळ आपल्या अंगी का भिनले आहे? कळायला मार्ग नाही. या समतावादी व मानवतावादी लोकशाही प्रधान देशात आजही जातीयता पाळून जातीयतेला खतपाणी घालण्याचे काम इथले राजकारणी लोक करत आहेत.जातीच्या व धर्माच्या नावावर सामाजिक दंगली घडवून आपलीच राजकीय पोळी भाजून घेत आहेत. एवढे गलिच्छ राजकारण आपल्या भारतातील राजकीय पक्षाचे लोक करत आहेत.

आजकाल केवळ जाती व धर्मावर निवडणूका लढवल्या जात आहेत. जाती व धर्मावर निवडणूका लढवणारा देश ही भारताची नवी ओळख आता जगासमोर आली आहे. आपल्या भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानात केवळ माणसाला व मानवतेला महत्व दिले आहे. जातीयतेला कसलाच थारा दिला नाही. आम्ही सारे भारतीय आहोत असा उल्लेख संविधानात केला आहे. कारण डॉ.बाबासाहेबांना माहीत होते की, आपल्या सर्व भारतीयांच्या शरीरात एकच रक्त आहे. आणि प्रत्येकाच्या रक्ताचा रंग लाल आहे. जेव्हा माणसाला रक्ताची गरज भासते, तेव्हा माणूस जातपात विचारत नाही. तेव्हा फक्त स्वतःचा जीव वाचवायचा बघतो. आणि दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ग्रामीण भागात आजही अक्कर माशी व बारा माशी ही म्हण प्रचलित आहे. आणि ही म्हण प्रत्येक समाजात द्वेष व भेदभाव निर्माण करत आहे. उच्चनीचता दाखवत आहे. हे अगोदर बंद व्हायला पाहिजे. तरच आपल्याला खरे सुशिक्षित व विज्ञानवादी म्हणता येईल. आपल्या भारतीय महापुरुषांच्या विचारांचे खरेखुरे पाईक म्हणता येईल. आपले महापुरुष आपल्यासाठी आदर्श व प्रेरणास्थान आहेत. त्यांनी जीवनभर जातीवादी व धर्मवादी व्यवस्थेला समूळ नष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

पण तरी सुद्धा आपण त्यांच्या विचारांना व भावनांना पायदळी तुडवून त्यांचा घोर अपमान करत आहोत. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व अण्णाभाऊ साठे या महापुरुषांनी जातीला व धर्माला बगल देऊन समाजात समता, बंधुता व मानवता प्रस्थापित करण्याचे ऐतिहासिक काम केले आहे. त्यांच्या या अलौकिक कार्याला जगात तोड नाही. धर्मापेक्षा माणसे महत्त्वाची असतात, हे त्यांनी प्रत्येक भाषणातून व लेखनातून वेळोवेळी ठणकावून सांगितले आहे. कारण माणसे जगली तरच धर्म टिकणार आहे. माणसेच नसतील तर मग धर्माला घेऊन काय चाटायचे आहे. असा लाखमोलाचा संदेश परमपूज्य, बोधिसत्व, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समस्त मानवजातीला दिला आहे. अशा या थोर महापुरुषांच्या विचारांना सत्यात उतरवून जातीला व धर्माला आपण सर्वांनी मुठमाती दिली पाहिजे. तरच आपल्याला या भारताचे खरे नागरिक म्हणता येईल. चला तर मग जातीला व धर्माला देऊया मुठमाती...समस्त मानवजातीच्या हितासाठी... ज्या दिवशी तमाम भारतीयांच्या मनातील जातीयतेचे विखारी खुळ निघून जाईल, त्या दिवशी आपल्या भारत देशात अमुलाग्र बदल झाल्याशिवाय राहणार नाही. फक्त गरज आहे, ती आपल्याला आपल्या भारतीय महामानवांचे समतावादी व मानवतावादी विचार अंगीकारण्याची....

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**मु.पो.खडाळी, ता.अहमदपूर**
**जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

## साडेसाती...

**भले असो राजा रंक**
**साडेसाती ना टळली**
**शनैश्वरांची वक्रदृष्टी**
**अचूक वेळी वळली**

**कधी केवढे चुकलो**
**पापे आपली कळली**
**पातकांच्या राड्यात**
**पुण्य कर्मेही मळली**

**निराशा नकारात्मकी**
**खंबीर उभारी गळली**
**स्वप्नेकोवळीअंकुरली**
**डोळ्यांसमोर जळली**

**भिती अंतरात दाटली**
**सावलीसुध्दा पोळली**
**कडवट चव बदलेना**
**साखरपाकातघोळली**

**स्वतासोबतपरिवारही**
**आप्तेष्ट दुःखा दळली**
**जमलेली सुस्थिर घडी**
**क्षणार्धा का उधळली**

**सुखाचीचाहूल अंमळ**
**मृगजळावरी भाळली**
**स्पर्शाची जाण बोथट**
**काटेरी माळ माळली**

**शिस्त लावे साडेसाती**
**मुठ लाखाची झाकली**
**किंमत कळते सुखाची**
**दुःखाची फळे चाखली**

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वृत्त, अचूक बातमी

## चंदनगर परिसरात एका तरुणाचा खून !




**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.१८, चंदन नगर (पुणे) :** गुरुवारी रात्री चंदनगर परिसरात एका तरुणाचा खून करण्यात आला असून प्रदीप अडागळे असे मृत तरुणाचे नाव आहे. पोलीसांनी दिलेल्या माहिती नुसार या प्रकरणी चंदननगर पोलिसांनी दोन आरोपींना ताब्यात घेतले आहे. मिळालेल्या माहितीनूसार, ऋषी काकडे आणि त्याची आई सुनीता काकडे या दोघांनी मिळून त्याचे डोक्यात फरशीच्या तुकड्याने वार केले. अडागळे गंभीर अवस्थेत असताना त्याला ससून येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

# भाषा ही संस्कृतीची आस्था असल्याने तीचा धर्माशी काहीही संबंध नाही



भारतातील प्रत्येक भाषा संस्कृतीच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या आहेत; ज्याप्रमाणे गंगा, यमुना, कावेरी, गोदावरी, तापी, कृष्णा, नर्मदा इत्यादी अनेक नद्यांच्या सोज्वळ आणि निर्मळते मधुनच भारतीय भाषेचा उगम झाला आहे. त्यामुळे त्याला धर्माशी जोडता येणार नाही. आपण जगात कुठेही जा परंतु भारतीय संस्कृती, भाषा, वेगवेगळे रहाणीमान, खानपान, व्यंजनाचे वेगवेगळे प्रकार या संपूर्ण परंपरा हजारो वर्षांपासून भारतातुनच निर्माण झालेले वटवृक्ष आहे आणि तीच परंपरा आताही सुरूच आहे. भाषा ही विचारांच्या देवाणघेवाणीचे एक मोठे माध्यम आहे.

तिच्या माध्यमातून विविध आचार-विचार आणि श्रध्दा असलेले लोक जोडले जातात. ती त्यांच्या विभाजनाचे कारण बनू नये, अशी अपेक्षा व्यक्त करत नगरपरिषदेच्या क्षेत्रात राहणारे लोक किंवा लोकांचा समूह उर्दू भाषेशी परिचित असेल तर किमान नगर परिषदेच्या फलकावर अधिकृत भाषेव्यतिरिक्त म्हणजेच मराठी व्यतिरिक्त उर्दू वापरल्यास कोणताही आक्षेप नसावा असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. भारतात अनेक धर्मांचे लोक रहातात.त्यामुळे भाषा आणि धर्म याचा कुठेही संबंध जुळुच शकत नाही. कारण भारतात २८ राज्य व ८ केंद्रशासित प्रदेश आहेत त्या-त्या अनुषंगाने भाषेचे सुध्दा वर्णन होत असते. उदाहरण द्यायचे झाले तर महाराष्ट्रांतील मराठी, गुजरात मधील गुजराती, तामिळनाडू मधील तामिळ अशा प्रकारे प्रत्येक राज्यात भाषेचे आगळेवेगळे रूप दिसुन येते व त्याची गणना समाजामध्ये होते. त्याचप्रमाणे उर्दू भाषेचा जन्म सुद्धा भारतातील आहे तिचा धर्माशी काहीही संबंध नाही. इंग्रजी भाषा ही इंग्रजांनी भारतावर लादलेली भाषा आहे. त्यामुळे इंग्रजी भाषा सोडली तर भारतातील संपूर्ण भाषांची नाळ भारतभूमीतच गाडली आहे. महाराष्ट्रातील अकोला जिल्ह्यातील पातूर नगरपरिषदेतील फलकावर उर्दू भाषेच्या वापराला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली उर्दू भाषा हा धर्म नाही. ही लोकांमध्ये फूट पाडण्याचे कारण बनू नये. उर्दू हे गंगा-यमुना संस्कृती (गंगा-जमुनी तहजीब) किंवा हिंदुस्थानी संस्कृतीचे उत्तर उदाहरण आहे, असे हा निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले. भाषा म्हणजे कोणताही धर्म नाही ती धर्माचे प्रतिनिधित्वही करीत नाही असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. भाषा म्हणजे एखाद्या समाजाच्या प्रगतीचे मोजमाप आहे. उत्तर आणि मध्य भारतातील मैदानी भागांचे मिश्र सांस्कृतिक स्वरूप असलेल्या गंगा-यमुना संस्कृती किंवा हिंदुस्थानी तहजीबचे उत्तम उदाहरण असलेल्या उर्दूच्या बाबतीतही हेच आहे.सर्वोच्च न्यायालय म्हणतो की, उर्दू ही भारतासाठी परकी आहे, या गैरसमजातून उर्दूविषयीचा पूर्वग्रह निर्माण झाला आहे.

उर्दू हीदेखील मराठी आणि हिंदीप्रमाणेच इंडो-आर्यन भाषा आहे व या भूमीत जन्माला आलेली ही भाषा आहे अशा स्पष्ट शब्दात सांगितले.भाषेचा विरोधच करायचा असेल तर इंग्रजी भाषेचा करावा आणि करायला पाहिजे. कारण देशातील इतर भाषांना इंग्रजी भाषा पोखरत असुन देशात घर करण्याचा प्रयत्न करीत आहे याकडे भारतीयांनी लक्ष देण्याची गरज आहे. आज भारतातील प्रत्येक राज्यातील वेगवेगळ्या भाषेचा गोडवा पहायला मिळतो. याहीपलीकडे आपण गेलो तर प्रत्येक राज्याच्या ४० किलोमीटर अंतरानंतर आपल्याला तेथील भाषा,रहनसहन आणि संस्कृती यांचेही आगळेवेगळे दर्शन होते.म्हणजे इंग्रजी भाषा सोडली तर भारतातील प्रत्येक भाषा हिंदुस्थानच्या रक्तात आणि नसानसामध्ये दिसून येते.त्यामुळे उर्दू भाषा भारतीयांसाठी नवीन नसुन ती आपलीच आहे हेही लक्षात ठेवले पाहिजे. भारतातील प्रत्येक भाषा ही दैवी देण असुन ती सर्वांनीच स्विकारली पाहिजे. कारण हिंदू, बौद्ध, शिख, ईसाई, मुस्लिम या संपूर्ण धर्मांच्या साधुसंतांनी, महाज्ञानी, तपस्वी यांच्या परिश्रमातूनच भारतातील प्रत्येक भाषेचा उगम झाला आहे व ते सर्वांचेच श्रध्दा स्थान आहे.त्यामुळे भारतातील कोणतीही भाषा धर्माशी जोडली जावू शकत नाही. भाषा ही ईश्वरी देण आहे तीचा आदर व्हायलाच पाहिजे.त्याचप्रमाणे देशातील प्रत्येक राज्यांनी आपापल्या राज्यातील भाषेचा वापर जास्तीत जास्त करावा यामुळे प्रत्येक राज्यातील मातृभाषा सुरक्षित राहील.कारण मातृभाषा ही कोणाही कडून शिकविली जात नाही ती जन्मताच अवगत होत असते म्हणूनच तिला मातृभाषा म्हटल्या जाते.त्यामुळे देशातील संपूर्ण भाषा, मातृभाषा आणि राष्ट्रीय भाषेचा आदर सर्वांनीच केला पाहिजे.यामुळे देशातील संपूर्ण भाषा व बोली सुरक्षित राहील.जय हिंद!



**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## भाजप सरकार विरोधात काँग्रेसचे ठाण्यात निषेध आंदोलन



**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.१७, ठाणे :** नॅशनल हेरॉल्ड प्रकरणी काँग्रेस नेत्या सोनियाजी गांधी व विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांच्या विरोधात मोदी शासनाने द्वेषपूर्ण व सुडबुद्धीच्या भावनेने कारवाई करण्याचा घेतलेला निर्णय हा लोकशाहीला घातक आहे. या अन्यायकारक निर्णयाच्या विरुद्ध काँग्रेस पक्षाने लढा सुरू केला असून आज जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे येथे ठाणे शहर जिल्हा व ठाणे ग्रामीण जिल्हा काँग्रेसच्या वतीने निषेध आंदोलन करण्यात आले. महाराष्ट्र काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार ठाणे शहर जिल्हाध्यक्ष विक्रांत चव्हाण व ठाणे ग्रामीण जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे यांनी आयोजित केलेल्या या आंदोलनाला राष्ट्रीय सचिव तथा कोकण प्रभारी वेंकटेश यांच्यासह ठाणे शहर, ठाणे ग्रामीण जिल्हा, कल्याण शहर जिल्हा, भिवंडी शहर जिल्हा व उल्हासनगर शहर जिल्हा मधील काँग्रेसचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पनवेल महानगरपालिकेची धडाकेबाज कारवाई !

## ३ हजार ५०० किलो प्लास्टिक जप्त, २५ हजार दंड वसूल

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१८, पनवेल :** लास्टिक बंदी मोहिमेअंतर्गत पनवेल महानगरपालिकेने धडाकेबाज कारवाई करत ३ हजार ५०० किलो प्लास्टिक पिशव्या जप्त केल्या असून २५ हजार रुपयांचा दंडही वसूल केला आहे. आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या नियंत्रणात पनवेलच्या सर्व विभागात ही मोहीम राबविली.

पनवेल महानगरपालिका हद्दीत चारही प्रभाग समिती निहाय प्लास्टिक बंदी कारवाई करण्यात आली यामध्ये कामोठे प्रभाग समितीमध्ये प्लास्टिक जप्ती कारवाईवेळी प्रभाग क कामोठे मध्ये सुमारे ३०० किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. यामध्ये प्लास्टिक चमचे, ग्लास, वाट्या, प्लेट यांचा साठा जप्त करण्यात आला. तसेच यावेळी एकूण १० हजार दंड जमा करण्यात आला.

प्लास्टिक बंदी कारवाई दरम्यान नावडे उपविभागात प्लास्टिक साठा करणाऱ्या गोडाऊनवर कारवाई करून सुमारे १ हजार ८५० किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले.

तसेच खारघर प्रभाग समिती अ मध्ये प्लास्टिक विरोधी कारवाई दरम्यान प्लास्टिक २५० किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. यावेळी एकूण ५ हजार दंड वसूल करण्यात आला.

याबरोबरच कळंबोली प्रभाग समिती ब मध्ये प्लास्टिक विरोधी कारवाई दरम्यान ४५० किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. यावेळी एकुण पाच हजार दंड जमा करण्यात आला.

तसेच पनवेल प्रभाग समिती ड मध्ये प्लास्टिक विरोधी कारवाई दरम्यान ६५० किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले तसेच एकूण ५ हजार दंड जमा करण्यात आला.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील सर्व नागरिकांनी प्लास्टिक पिशव्यांचा वापर न करता कागदी अथवा कापडी पिशव्यांचा वापर करून पनवेल महानगरपालिका प्लास्टिक मुक्त करण्याच्या दृष्टीने महापालिकेस मदत करावी, असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

एकल प्लास्टिकचा वापर मार्च २०१८ पासून प्रतिबंधित आहेत. यामध्ये सर्व प्रकारच्या प्लास्टिकच्या पिशव्या (कॅरी बॅग्स) – हॅंडल असलेल्या व नसलेल्या कंपोस्टेबल व प्लास्टिक (कचरा व नर्सरीसाठीच्या पिशव्या सोडून) सर्व प्रकारच्या नॉन ओव्हन पॉलीप्रोपीलीन बॅग्स ६० ग्रॅम पर स्क्वेअर मीटर (जीएसएम) पेक्षा कमी जाडीच्या पिशव्या यावरती बंदी आहे.

१) प्लास्टिकच्या कांडयासह कानकोरणी, फुग्यांसाठी प्लॅस्टिकच्या कांडया, प्लास्टिकचे झेंडे, कॅंडी, कांडया, आईस्क्रीम कांडया. सजावटीसाठी प्लास्टिक व पॉलिस्टीरीन (थर्माकोल) यावरती बंदी करण्यात आली आहे.

२) दुकानदारांनी कंपोस्टेबल पदार्थापासून बनविण्यात आलेले एकल वापर वस्तु उदा. स्ट्रॉ, ताट, कप्स, प्लेटस, ग्लासेस, काटे, चमचे, भांडे, वाडगा, कन्टेनर इ. तथापि, कंपोस्टेबल पदार्थापासून प्लास्टीक पासून बनविलेल्या अशा वस्तू कंपोस्टेबल असल्याबाबत सेंट्रल इन्स्टीट्यूट ऑफ प्लास्टीक इंजिनिअरींग अँड टेक्नॉलॉजी व केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्रमाणित करून घेणे बंधनकारक राहील.



## बोरीच्या ईश्वरी धायगुडेचे नवोदय मध्ये यश



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१८, खंडाळा (सातारा) :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बोरी तालुका खंडाळा येथील इयत्ता पाचवीतील ईश्वरी सचिन धायगुडे हिने नवोदय परीक्षेत उतुंग यश मिळवले तिला बोरी जि.प.प्रा. शिक्षिका म्हणून कल्पना राऊत मॅडम यांचे बहुमोल असे मार्गदर्शन लाभले.

एकीकडे सध्या इंग्लिश मिडीयम शिक्षणासाठी विद्यार्थी व पालकांचा ओढा असताना जि.परिषद शाळेत शिक्षण घेणारे विध्यार्थी जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर अभ्यासातील सातत्याने नवोदय सारख्या कठीण परीक्षा देखील उत्तीर्ण होऊ शकतात हे ईश्वरी धायगुडे हिने सिद्ध करून दाखवलं आहे.

या यशाबद्दल ईश्वरी व शिक्षिका राऊत यांचे खंडाळा तालुका गटविकास अधिकारी अनिल वाघमारे,गटशिक्षण अधिकारी गजानन आडे,विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख राजीव जाधव आदींनी अभिनंदन केले त्याचबरोबर खंडाळा व बोरी पंचक्रोशीतूनदेखील ईश्वरी आणि तिच्या मार्गदर्शक शिक्षिका राऊत यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## अवैध मद्यविक्रीमुळे परमिट रूम, बार चालकांवर अन्याय...



**अक्षराज : प्रतिनीधी**

**दि.१८, धाराशिव :** जिल्ह्यातील ढाबे व हॉटेलमधून अनाधिकृतपणे होणारी मद्य विक्री तसेच वाईन शॉप व बिअर शॉपी मधून अवैध मद्य विक्री करणाऱ्यांवर कायमस्वरूपी कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी धाराशिव जिल्हा परमिट रूम असोसिएशनच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. त्याचबरोबर परमिट रूम चालकांवर होत असलेला अन्याय दूर करावा अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, जिल्ह्यात परमिट रूम अनुज्ञप्ती नूतनीकरण फी १५ टक्क्याने वाढवल्यामुळे आणि शासनाने १०% व्हॅट वाढविल्याने याला कंटाळून २० ते २५ अनुज्ञप्ती धारकानी नुतनीकरणच केलेले नाही. तरी ही बाब शासनाला न परवडणारी आहे. शासनाचा महसुल देखील मोठ्या प्रमाणात बुडणार आहे. परमिट रूम व्यवसाय धारकाच्या व्यवसायामध्ये बऱ्याच अडचणी निर्माण झालेल्या आहेत. यामुळे परमिटरूम व बिअरबार मधील मद्य विक्रीची बऱ्याच प्रमाणात घट झालेली आहे.

सध्या धाराशिव शहरात व जिल्ह्यात अनेक विनापरवाना अनाधिकृत ढाबे व हॉटेल्स आहेत. या ढाबे, विना परवाना हॉटेल्स, हातगाडे चालकांकडून अनाधिकृतपणे सर्रास मद्यविक्री केली जाते तरी त्यांच्यावर कसलेही गुन्हे दाखल केले जात नाहीत. केवळ किरकोळ स्वरुपाचे गुन्हे दाखल करुन त्यांना सोडले जाते. त्यामुळे अनुज्ञप्तीधारकावर हा अन्यायच आहे.

तरी त्यांच्यावर कलम ६८/८४ नुसार जागा मालक, ढाबा चालक यांच्यावर गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल करावे. दोन गुन्हयापेक्षा जास्त गुन्हे असणाऱ्या व्यक्तींना हद्दपार करण्यात यावे.

राज्य उत्पादन शुल्क आयुक्त मुंबई यांनी दि. २८ मार्च २०२५ रोजी क्र. ११२०२५/ अनाधिकृत मद्य विक्री/ मोहिम / ९ या परिपत्रकानुसार कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. तरी या परिपत्रकाची अंमलबजावणी व्हावी.

या सर्व बाबींचा विचार होवून अशा अनाधिकृत व्यवसायावर कायम स्वरूपी कडक कारवाई करून आम्हा अधिकृत व्यवसायीकांना सहकार्य करून न्याय दयावा अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनावर ज्येष्ठ मार्गदर्शक संपतराव डोके, जिल्हा परमिट रूम असोसिएशनचे अध्यक्ष राजेंद्र चंद्रकांत आवटे, उपाध्यक्ष धर्मराज आण्णासाहेब सुर्यवंशी, सचिव बाळासाहेब दगडू लाकाळ, सुभाष शेट्टी, दयानंद नलावडे, कुमेश पवार, सोमलिंग खरे, नवनाथ भोसले, योगेश जाधव, सुनील सुर्यवंशी, सुहास पाटील, दत्तात्रय सुर्यवंशी, राजाभाऊ सुर्यवंशी, ज्ञानेश्वर घोगरे आदींची स्वाक्षरी आहे.

## विद्यार्थ्यांनी तांत्रिक ज्ञान अर्जित करावे यासाठी प्रयत्न : आ.वंजारी




**अक्षराज : प्रतिनीधी**

**दि.१७, चंद्रपूर :** मी पदवीधर मतदार संघाचा आमदार आहे. माझा मतदारसंघ, माझे सदस्यत्व शिक्षणाशी संबंधित असल्याचे दर्शविते. त्यामुळे मिळणारा आमदार निधी हा शैक्षणिक उद्देशासाठीच खर्च व्हावा, असा संकल्प विजयी झाल्यानंतर केला होता. ह्या संकल्पपूर्तीसाठी दरवर्षी माझ्या मतदारसंघातील सहाही जिल्ह्यात माझा आमदार निधीच्या माध्यमातून ग्रंथालयांना सध्याच्या काळात आवश्यक असलेली पुस्तके आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या तांत्रिक आणि संगणकीय ज्ञानात भर पडावी या उद्देशाने संगणक वाटप करीत आहे. मागील पाच वर्षापासून हा उपक्रम सुरु आहे. माझा निधी ज्ञानवृध्दीसाठी खर्च होत आहे, यांचे समाधान होत असल्याचे प्रतिपादन विधानपरिषदेतील मुख्य प्रतोद आमदार अभिजित वंजारी यांनी केले.

चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवनात गुरुवारी (ता. १७) आयोजित 'कर्तव्यपूर्ती सोहळ्यात' ते बोलत होते. यावेळी मंचावर आ. अभिजित वंजारी यांच्यासह शिक्षक आमदार सुधाकर अडबाले, माजी आमदार सुभाष धोटे, माजी आमदार डॉ. अविनाश वारजूरकर, चंद्रपूर शहर कॉंग्रेसचे अध्यक्ष रितेश तिवारी, चंद्रपूर शहर जिल्हा महिला कॉंग्रेस अध्यक्ष चंदा वैरागडे, ॲड. विजय मोगरे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) राजेश पातळे, गोविंदराव वंजारी फाउंडेशनचे सचिव डॉ. हेमंत सोनारे उपस्थित होते.

## पिंपळगाव जोगे कालव्यातून उद्या आवर्तन सुटणार : आ. काशिनाथ दाते

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१८, सुपा (अहिल्यानगर) :** शुक्रवार दि.१८ एप्रिल २०२५ पिंपळगाव जोगे कालव्यातून २० एप्रिलला आवर्तन सुटणार असल्याची माहिती आमदार काशिनाथ दाते सर यांनी दिली आहे. पारनेर तालुक्यातील कळस, पाडळी आळे, अळकुटी, शेरी कासारे, रांधे, पाबळ, लोणी मावळा, देवीभोयरे, वडझिरे टेल या गावांतुन पिंपळगाव जोगे डावा कालवा प्रवाहित होतो. सध्या उष्णतेची तीव्रता खुप मोठ्या प्रमाणावर झाली आहे. या गावांमधून ग्रामस्थांनी जनावरांसाठी पिण्याचे पाणी मिळणे अत्यावश्यक असल्याची मागणी केली आहे. जलसंपदामंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांना पिंपळगाव जोगे डावा कालव्यातून पाणी आवर्तन सोडण्यासाठी मागणी केली असता ना. विखे पाटील यांनी सकारात्मक विचार करून २० एप्रिलला पाणी सोडणार असल्याचे आ. काशिनाथ दाते यांनी सांगितले. पिंपळगाव जोगा धरणातून महिना उलटूनही पारनेर तालुक्यातील कळस, पाडळी आळे, अळकुटी, शेरी कासारे, रांधे, पाबळ, लोणी मावळा, देवीभोयरे, वडझिरे टेल या गावांना आवर्तनातून पाणी मिळाले नाही. त्यामुळे पारनेर तालुक्यातील गावांना आवर्तनातून तातडीने पाणी द्यावे अशी मागणी राज्याचे जलसंपदामंत्री ना. विखे पाटील यांच्याकडे केली. त्यानुसार २० एप्रिलला पारनेर तालुक्यातील गावांना पिंपळगाव जोगा धरणातून पाणी सोडण्यात येणार असल्याचे आश्वासन मंत्री विखे पाटील साहेब यांनी दिले.



माझ्या मतदारसंघातील या कालव्यावर काही गावे पूर्णतः पिण्याच्या पाण्यासाठी अवलंबून आहेत. सध्या तीव्र उष्णतेमुळे पाणी पातळी खालवली गेल्याने पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. हे पाणी फक्त पिण्यासाठी असल्याने सर्व नागरिकांनी पाण्याचा जपून वापर करावा.

**– आ. काशिनाथ दाते**

## प्रतिक्षानगर मनपा शाळेत स्वरक्षणाचे धडे...

**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.१८, मुंबई :** समाजातील वाढत्या गुन्हेगारीमुळे सर्वसामान्य माणसाला जीवन जगणे जिकरीचे झाले आहे. त्यातच स्त्रियांवर आणि लहान लहान मुलींवर होणाऱ्या दैनंदिन अत्याचाराने परिसीमा गाठली आहे. या पुरुषी अत्याचाराला तितकंच ठामपणे प्रत्युत्तर देण्यासाठी महिला आणि मुलींनी सक्षम होणे काळाची गरज आहे.मुलींनी विद्यार्थी दशेतच प्रतिकार करायला शिकावं म्हणून प्रतीक्षा नगर महापालिका शाळेतील शारीरिक शिक्षण शिक्षिका माधवी पोकळे यांच्या मार्गदर्शनाखाली व शाळेच्या माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने 'झाशी स्वरक्षक पथकाची' स्थापना केली असून या पथकातील स्वरक्षकांनी उत्तम प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

सध्याच्या परिस्थितीत महिला आणि मुलींची सुरक्षा ही अत्यावश्यक बाब झाली आहे.गल्लोगल्ली,नाक्यानाक्यावर टवाळखोर मुलांचे टोळके उभे राहून महिला व मुलींची छेड काढण्याचा प्रयत्न करत आहेत. आपल्या इज्जतीचा पंचनामा व्हायला नको म्हणून या महिला व मुली या टवाळखोर व संधीसाधू मुलांच्या टोळक्याचा सामना करू शकत नाहीत.परिणामी या टवाळखोर मुलांचे फावते आणि ते आणखी धाडस करतात.त्यातूनच अघटीत घटना घडत आहेत.या गोष्टीचा शारीरिक शिक्षण शिक्षिका माधवी पोकळे यांनी मुळाशी जाऊन विचार केला आणि मनोमन काहीतरी ठोक काम करायचे ठरवले.म्हणूनच शालेय मुलींपासून याची सुरुवात करावी असे वाटल्याने त्यांनी आपल्या प्रतिक्षानगर महापालिका शाळेपासून याची सुरुवात केली आहे. कराटे, बॉक्सिंग, ज्यूडो, कुस्ती या विविध प्रकारच्या खेळाच्या माध्यमातून त्यांनी आपल्या शाळेच्या काही माजी विद्यार्थ्यांना सोबत घेऊन एक 'झाशी स्वरक्षक पथक' स्थापन केले आहे.

या पथकाच्या माध्यमातून मनपाच्या प्रत्येक शाळेत जाऊन तिथल्या मुलींना प्रात्यक्षिक दाखवून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करून अन्यायाविरुद्ध कसं लढायचं याचे प्रशिक्षण देणार आहोत असे माधवी पोकळे यांनी सांगितले आहे.यावेळी शाळेचे विद्यार्थी व सर्व शिक्षक उपस्थित होते.

या अतिशय स्तुत्य उपक्रमाबाबत फ/उत्तर विभागाचे प्रशासकीय अधिकारी किसन पावडे, वरीष्ठ पर्यवेक्षक दत्तू लवटे तसेच शाळेच्या मुख्याध्यापक सुजाता वळवी, आसावरी कारंडे, घोलप, सोनार यांनी या 'झाशी स्वरक्षक पथकाचे' कौतुक व अभिनंदन केले.

## 'आदिवासी शिक्षक प्रतिष्ठान' चा प्रथम वर्धापन दिन उत्साहात साजरा



**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.१७, ठाणे :** नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र.२८, वाशी येथे आदिवासी शिक्षक प्रतिष्ठान, नवी मुंबईचा प्रथम वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी माजी नगरसेवक रमेश डोळे, माजी नगरसेविका व शिक्षण मंडळ उपसभापती राजश्री कातकरी, माजी नगरसेविका जयश्री ठाकूर हे मान्यवर उपस्थित होते. प्रसंगी सुप्रसिद्ध लेखक व कवी अर्जुन बांबेरे यांनी उपस्थिती नोंदवून आदिवासी अस्मिता या विषयावर संबोधित केले. डोळे साहेब यांनी शिक्षक व विद्यार्थी यांच्या समस्या व त्यावरील उपाययोजना तसेच कला,क्रीडा,सांस्कृतिक व सामाजिक विषयावर चर्चा केली. शिक्षकांच्या प्रश्नाबाबत आपण कायमच कटिबद्ध असल्याचे आश्वासित केले. राजश्री कातकरी व जयश्री ठाकूर यांनीही शिक्षकांसोबत संवाद साधला.

सदर प्रसंगी आदिवासी शिक्षक प्रतिष्ठान नवी मुंबईचे संस्थापक अध्यक्ष हरिश्चंद्र फर्डे यांनी अध्यक्षीय भाषणात प्रतिष्ठानचे ध्येय व उद्दिष्टे याबाबत विवेचन केले. प्रतिष्ठानचे सचिव सुनील गावित सर यांनी प्रास्ताविक केले. प्रतिष्ठानचे सदस्य काळूराम भगत, एड.महादू येंदे व स्वप्नील सोळंकी यांनीही आपले मत व्यक्त केले.

प्रतिष्ठानच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने उपाध्यक्षा मोहिनी डोके, खजिनदार प्रमोद जाधव, सदस्य शिरीष पाटील, जयेंद्र घेगड, आदि.बुधा ढवळे, नारायण मौळे, आदि. भास्कर भोये, महाराष्ट्र राज्य शिक्षक संघ, शाखा नवी मुंबईचे सरचिटणीस आत्माराम आग्रे, प्रसिद्धी प्रमुख बबन दरेकर, कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे अध्यक्ष सुनील बोरसे तसेच शिक्षक सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदी.प्रकाश भोये व आदि. नितीन भरसट यांनी केले. आभार प्रदर्शन नवनीत चौधरी यांनी केले.

# ३० लाखांच्या जबरी चोरीचा छडा – ठाणे गुन्हे शाखेच्या घटक-१ ची मोठी कामगिरी

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१७, ठाणे :** ठाणे गुन्हे शाखा घटक-१ च्या पोलिसांनी एक मोठी कारवाई करत केरळ राज्यातून आलेल्या दरोडेखोर टोळीचा पर्दाफाश केला आहे. या टोळीने २१ फेब्रुवारी २०२५ रोजी मुंबईहून ठाण्यात येणाऱ्या एका व्यक्तीकडून ३० लाख रुपयांची रोख रक्कम जबरदस्तीने हिसकावून नेली होती. या घटनेमुळे संपूर्ण ठाण्यात खळबळ उडाली होती.

२१ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७.१५ वाजता, आसिफ अहमद रेहमतुल्ला अन्सारी (वय ४३) हे काळबादेवी, मुंबई येथील 'प्रॉमिस इंटरप्रायजेस' या कंपनीचे ३० लाख रुपये रोख रक्कम सॅक बॅगेत घेऊन ठाणे रेल्वे स्टेशनजवळील ओम साईनाथ पार्किंगमध्ये मोटारसायकल काढत असताना, चार अनोळखी इसमांनी त्यांना घेरून, चेहऱ्यावर स्प्रे करून बॅग हिसकावून पळ काढला. या प्रकरणी नौपाडा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हे शाखा घटक-१ च्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी बारकाईने तपास करून, तांत्रिक साधनांच्या मदतीने केरळ येथील ५ आरोपींचा शोध लावला. त्यांना अटक करून त्यांच्याकडून एकूण १०.५० लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

**जप्त मुद्देमालामध्ये :**

७.५० लाख रुपये रोख (५०० रुपयांच्या १५ बंडल्स)

१.५० लाख रुपये किंमतीचा आयफोन (प्रबुलदेव पुल्लीवता याने खरेदी केलेला)

१.५० लाख रुपये किंमतीचा आयफोन (अखिल कृष्णा याने खरेदी केलेला)

**अटक आरोपींची नावे व पत्ते :**

**१.** विघ्नेश पोकेन के (३१ वर्षे) – जि. कालीकत, केरळ

**२.** सुहात मोईउद्दीन खोया टी.पी. (३१ वर्षे) – जि. कालीकत, केरळ

**३.** प्रबुलदेव प्रेमकुमार पुल्लीवता (२५ वर्षे) – जि. कन्नूर, केरळ

**४.** अखिल किष्णा पी.व्ही. (२७ वर्षे) – जि. कन्नूर, केरळ



**५.** सुबिलेश के. बालकिश्नन (३२ वर्षे) – जि. कोझीकोड, केरळ (साथीदार – केरळमधून अटक)

या सर्व आरोपींना १९ एप्रिल २०२५ पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. त्यांच्या चौकशीतून असे उघड झाले आहे की, हे सर्व आरोपी केरळमधील असून महाराष्ट्रात केवळ गुन्हा करण्यासाठी येत होते.

गुन्हा करून ते लगेच परत केरळला पळून जात होते. त्यामुळे त्यांनी महाराष्ट्रातील किंवा इतर राज्यांतील आणखी कुठे गुन्हे केले आहेत का, याचा तपास सुरु आहे.

ही कारवाई पोलीस उपायुक्त (गुन्हे) अमरसिंह जाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त शेखर बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन गायकवाड त्यांच्या सहकाऱ्यांनी मिळून केली कारवाईत सहभागी अधिकारी – अमित यादव, विकास सुर्यवशी, दीपक घुगे, रविंद्र पाटील, सुनिल माने, भरत आरवंदेकर, धनंजय आहेर, नागराज सोनकडे, प्रशांत निकुंभ, अविनाश पाटील, शब्बीर फरास, गणेश बडगुजर, मयुर लोखंडे, सागर सुरळकर, बाळू मुकणे आणि शशिकांत सावंत.

# खा. राहुल गांधीच्या नेतृत्वात कॉंग्रेसला गतवैभव प्राप्त होईल : आ.अभिजित वंजारी

**अक्षराज : प्रतिनीधी**

**दि.१८, चंद्रपूर :** लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाने नेत्रदीपक कामगिरी करून १३ खासदार निवडून आणले. मात्र, विधानसभा निवडणुकीत पाहिजे त्या प्रमाणात यश मिळाले नाही. फक्त १६ आमदार निवडून आले.

विधानसभा निवडणुकीत नेमक्या काय चुका झाल्यात यावर विचारमंथन करून भविष्यात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुर्ण ताकदीने लढवायच्या आहेत. काँग्रेस कार्यकर्त्यांनी खचून न जाता जोमाने कामाला लागावे, येणारा काळ हा काँग्रेस आणि राहुलजी गांधी यांचा असणार आहे. सर्वांनी लक्षात घ्यावे व्यक्ती मोठा नाही, पक्ष, संघटना ही सर्वप्रथम आहे. काँग्रेस पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी सक्षम पदाधिकारी नेमून जनसामान्यांचे काम करण्याची गरज आहे. देशात आणि राज्यात आज अत्यंत निराशाजनक वातावरण आहे. जनतेचे प्रश्न मोठ्या




प्रमाणात उभे आहेत. जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी काँग्रेसला संघर्ष करावा लागेल. रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल, त्यातून कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढेल आणि जिल्ह्यात, राज्यत, देशात काँग्रेस गतवैभव प्राप्त करेल, असे प्रतिपादन चंद्रपूर काँग्रेसचे निरिक्षक, प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस आमदार अभिजित वंजारी यांनी हॉटेल सिद्धार्थ प्रिमीयर येथे चंद्रपूर जिल्हा काँग्रेस आणि चंद्रपूर शहर काँग्रेस च्या वतीने आयोजित बैठकीत केले. यावेळी चंद्रपूर जिल्हा व शहर काँग्रेसने आपल्या कामाचा आढावा निरीक्षकांसमोर सादर केला. त्यानंतर ते चंद्रपूर शहर तसेच तालुका, शहर तसेच ग्रामीण पदाधिकारी, कार्यकर्त्यांशी संवाद साधून सर्वांची मते जाणून आपला अहवाल प्रदेश काँग्रेसला सादर करणार आहेत. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष चंद्रपूर काँग्रेसचे निरिक्षक आ. अभिजित वंजारी, चंद्रपूरच्या खासदार प्रतिभाताई धानोरकर, जिल्हा प्रभारी मुजीब पठाण, जिल्हाध्यक्ष माजी आमदार सुभाष धोटे, माजी आमदार देवराव भांडेकर, महिला जिल्हाध्यक्षा सुनंदाताई धोबे, शहर जिल्हाध्यक्ष रितेश तिवारी, माजी जिल्हाध्यक्ष विनायक बांगडे, सुभाषसिंग गौर, जिल्हा बँकेचे अध्यक्ष संतोषसिंह रावत, प्रदेश सचिव विनोद दत्तात्रय, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शंतनू धोटे, राजेश अडुर, एनएसयूआयचे जिल्हाध्यक्ष सफाक शेख, प्रवीण पडवेकर, माजी नगराध्यक्ष घनश्याम मुलचंदाणी, अरुण धोटे, सुनिता लोढीया, सुनिता अग्रवाल, चंदाताई वैरागडे, नंदू नागरकर, अ‍ॅड. विजय मोगरे, दिनेश चोखारे, उमाकांत धांडे, राजु रेड्डी, तालुकाध्यक्ष विजय गावंडे, अनिल नरुले, गोविंदा उपरे, नितीन गोहणे, रंजन लांडे, उत्तमराव पेचे, देविदास सातपुते, वासुदेव पाल, गुरूदास गुरूनुले, रमाकांत लोधे, खेमराज तिडके, प्रमोद चौधरी, मिलिंद भोयर, प्रशांत काळे, निर्मला कुडमेथे, सोनू दिवसे, यासह चंद्रपूर जिल्हा काँग्रेसच्या सर्व फ्रंटल आर्गनायझेशन चे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अपघातग्रस्त रुग्णांसाठी एक लाख रुपयांपर्यंतचे कॅशलेस उपचार – आरोग्य मंत्री

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१८, ठाणे :** रुग्णांना वेळेवर दर्जेदार तसेच कॅशलेस उपचार मिळावेत यासाठी रुग्णालये, सोसायटीचे अधिकारी व अंमलबजावणी संस्थांनी कठोर दक्षता बाळगावी. यात गैरप्रकार करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. तसेच अपघातग्रस्त रुग्णांसाठी एक लाख रुपयांपर्यंतचे कॅशलेस उपचार अंगीकृत व अन्य तातडीच्या रुग्णालयांमधून देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने कार्यवाही करावी, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.

राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या वरळी, मुंबई येथील मुख्यालयात आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनांच्या कामकाजाचा आढावा मंत्री आबिटकर यांनी घेतला. यावेळी आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओम प्रकाश शेटे, राज्य आरोग्य हमी सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण, उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. दयानंद जगताप, सार्वजनिक आरोग्य विभागाचे सहसचिव अशोक आत्राम, सहायक संचालक डॉ. रवींद्र शेटे आदि उपस्थित होते. बैठकी दरम्यान मंत्री आबिटकर यांनी




या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. यामध्ये योजनेतील अंगीकृत रुग्णालयांची संख्या १७९२ वरून ४१८० पर्यंत वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत ही निवड प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबविण्याचे त्यांनी आदेश दिले. या योजनेतील उपचार संख्येत वाढ, दरामध्ये सुधारणा, अवयव प्रत्यारोपणासारखे महागडे उपचार समाविष्ट करणे, तसेच प्राथमिक आरोग्य सेवाही योजनेत समाविष्ट करण्यासाठी अभ्यास समिती गठित करण्यात आली असून एक महिन्याच्या आत अहवाल सादर करण्याचे आदेश मंत्री आबिटकर यांनी यावेळी दिले. जनतेसाठी योजनेतील रुग्णालयांची माहिती, बेडची उपलब्धता आणि तक्रारी नोंदविण्यासाठी स्वतंत्र मोबाईल अ‍ॅप विकसित करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. प्रत्येक अंगीकृत रुग्णालयाने दर महिन्याला एक आरोग्य शिबिर आयोजित करून किमान पाच रुग्णांवर कॅशलेस उपचार करावेत, अशा शिबिरात लोकप्रतिनिधींना सहभागी करून घेऊन त्याची पूर्वप्रसिद्धी करावी, असे मंत्री आबिटकर यांनी यावेळी सांगितले. योजनेच्या अंमलबजावणीसाठी पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावर समित्या स्थापन करून त्यांच्या बैठका त्वरित आयोजित करण्यात याव्यात. तसेच आयुष्मान कार्ड वाटप मोहिमेस गती देण्यासाठी आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, रेशन दुकानदार आणि नागरी सेवा केंद्रांच्या माध्यमातून वाटप करण्याची योजना आखण्यात आली आहे. या कार्यासाठी त्यांना मिळणाऱ्या मानधनात वाढ करण्याचे निर्देशही मंत्री आबिटकर यांनी यावेळी दिले.

रुग्णालयांना मार्च महिन्यापासून सुमारे १,३०० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आल्याचे सांगून, यापुढेही आवश्यक निधी वेळोवेळी दिला जाईल. या महत्त्वाकांक्षी योजनेची अंमलबजावणी पूर्ण पारदर्शकपणे केली जावी आणि कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार सहन केला जाणार नाही, असे स्पष्ट निर्देश आरोग्यमंत्री आबिटकर यांनी यावेळी दिले.

# 'भारतीय जनता पार्टी' धाराशिव ची गांधी कुटुंबीयांविरुद्ध कारवाईची मागणी

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.१८, धाराशिव :** नॅशनल हेरॉल्ड या वृत्तपत्र कंपनीला काँग्रेसचे नेते सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांनी पक्षाच्या माध्यमातून ९० कोटी रुपये दिले होते. हा पैसा सर्वसामान्य जनतेचा असल्याने फसवणूक झाल्याचा आरोप आहे. या प्रकरणात त्यांच्याविरोधात हायकोर्टात याचिका दाखल करण्यात आली असून, त्यांना जामीन मंजूर झाला आहे. सुप्रीम कोर्टात अपील करून याचिका रद्द करण्याचा प्रयत्न करण्यात आला, परंतु ते



अपील नामंजूर करण्यात आले.

या पार्श्वभूमीवर युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांच्या सुचनेनुसार आमदार राणाजगजितसिंह पाटील,मा.आमदार सुजितसिंह ठाकूर,जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच भाजयुमो जिल्हाध्यक्ष राजसिंहराजे निंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली १७ एप्रिल रोजी धाराशिव येथे आंदोलन करण्यात आले. गांधी घराण्याने जनतेची फसवणूक केली असून, त्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी या आंदोलनातून करण्यात आली.

या आंदोलनाच्या माध्यमातून भाजपने असा इशारा दिला की, देशात कायदा व सुव्यवस्था सक्षम आहे आणि गांधी घराणे सामान्य जनतेची फसवणूक करत आहे, याला यापुढे पाठीशी घातले जाणार नाही. पुढील काळात भाजप अशा भ्रष्टाचाराच्या प्रकरणांवर अधिक आक्रमक भूमिका घेणार असल्याचे संकेतही देण्यात आले. प्रसंगी आंदोलनासाठी भाजप शहराध्यक्ष अभय इंगळे, विलास लोंढे, सरचिटणीस सचिन लोंढे, हिंमत भोसले, तालुका अध्यक्ष अजित खापरे, शहर अध्यक्ष प्रसाद मुंडे, रोहित देशमुख, प्रमोद बाचाटे, विशाल पाटील, सुनील पनगुडवाले, अभिजीत पतंगे, जयसिंग गायकवाड, अभिषेक कोळगे,अर्जुन पवार ओमकार देवकते, नवनाथ सोलंकर, सम्यक माळाले व कार्यकर्ते उपस्थित होते.

# थोडक्यात

## भाजप विरुद्ध शिवसेना जनता दरबार वरून रस्सीखेच

### राष्ट्रवादी शरद पवार पक्षाने जनता दरबारात घेतली उडी

**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.१७, ठाणे :** वनमंत्री गणेश नाईक यांच्या जनता दरबार नंतर शिवसेनेने देखील जनसंवाद सुरू केला असताना आता ठाणे महानगरपालिकेच्या मुख्यालयातील जनता दरबारासाठी ठाणे महापालिका येथील सभागृहाची मागणी शरद पवार च्या राष्ट्रवादीने देखील केली आहे.

शिवसेना शिंदे गट यांच्यामार्फत ठाणे महानगरपालिकेशी संबंधित समस्या सोडवण्यासाठी ठाणे महानगरपालिकेत जनसंवाद आयोजित केला होता.

ठाणे महानगरपालिकेच्या इमारतीमध्ये राजकीय पक्षांचे दरबार चालतात यावरून राष्ट्रवादीने आक्षेप घेत स्वतःसाठी ही जनता दरबार भरवण्यासाठी सभागृहाची मागणी केली आहे .

त्यामुळे भाजपा शिवसेना जनता दरबारात आता राष्ट्रवादीने देखील उडी घेतल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव यांना पत्राद्वारे राष्ट्रवादीचे ठाणे शहर अध्यक्ष सुहास देसाई यांनी सभागृह मोफत उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

## वन विभागाद्वारे एकूण ११ कृत्रिम पानवटे वनप्राण्यासाठी तयार




**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.१८. हदगाव (नांदेड)** : हदगाव तालुक्यात एप्रिल व मे महिन्यात तापमान ४० ते ४३ च्या डिग्री सेल्सिअस तापमान जवळपास जात आहे. त्यामुळे हदगाव वनपरिक्षेत्रांतर्गत वन प्राण्यासाठी पाणी उपलब्ध होणे अत्यंत गरजेचे असल्यामुळे. हदगाव वनपरिक्षेत्र अंतर्गत तालुक्यातील वन परीमंडळ तामसा,लोहा, व मनाठा मध्ये नांदेड उपवनरक्षक मा.केशव वाबळे साहेब व नांदेड सहाय्यक वनसंरक्षक बि.एन. ठाकुर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली हदगाव वनपरिक्षेत्र अधिकारी मा. विजय कटके साहेब यांनी वन्यप्राणी यांना पाणी पिण्यासाठी हदगाव तालुक्यात एकूण ११ कृत्रिम पाणवठे तयार केले, त्या मध्ये तामसा, लोहा, मनाठा, माळेगाव, तळ्याचीवाडी, निमगाव, कोंढुर, चाभरा, चोरंबा, गारगव्हाण असे अनेक गावात हदगाव वन विभागाने तत्परतेने उपलब्ध केल्याने वन प्राण्यासाठी वरदान ठरणार आहे. यामुळे पाण्यासाठी वनप्राण्याची भटकंती वस्तीकडे होणार नाही. त्यासाठी अकरा पानवटे तयार करण्यात आले त्यामध्ये हदगाव वन विभागाचे कर्मचारी नियमीतपणे टँकरद्वारे पाणी टाकले जात आहेत. तरी सदर पाणवठ्यावर ट्रॅप कॅमेरा बसवण्यात आले असून. तरी सदर कामाबद्दल वन्यजीव प्रेमीं यांच्यातून समाधान व्यक्त होत असल्याचे दिसून येत आहे.

## ढोकेश्वर विद्यालयाचे प्रा.सुनिल वाव्हळ यांचा सेवापूर्ती निमित्त गौरव




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१८, पारनेर (अहिल्यानगर)** : चौकसवृत्ती, जिज्ञासा आणि कामाचे नियोजनामुळे प्राचार्य सुनील वाव्हळ जीवनात यशस्वी झाले. शांत स्वभाव, सारासार विचार करून निर्णय घेण्याची क्षमता हे त्यांचे गुण वाखाणण्यासारखे असून. विद्यालयाने केलेली प्रगती हे त्यांच्या दूरदृष्टीचे घोकत आहे,शिक्षक हा आपल्या समाजाचा आधारस्तंभ आहे. म्हणून शिक्षकांनी प्राचार्य सुनिल वाव्हळ सरांप्रमाणे प्रामाणिकपणे, कर्तव्य निष्ठेने आणि समर्पण भावनेने काम करावे असे प्रतिपादन अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्रजी दरे साहेब यांनी केले. अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या श्री ढोकेश्वर माध्य. व उच्च माध्य. विद्यालयाचे प्राचार्य सुनिल वाव्हळ हे आपल्या ३४ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर ३० एप्रिल अखेर सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या सेवानिवृत्तीचा सेवापुर्ती गौरव कार्यक्रम विद्यालयाने आयोजित केला होता. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष रा. ह. दरे साहेब प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त सिताराम खिलारी होते. अध्यक्ष स्थानावरून बोलताना खिलारी म्हणाले की, ज्याप्रमाणे प्राचार्य सुनिल वाव्हळ यांनी संस्थेमध्ये निष्ठेने काम केले तसेच काम शिक्षकांनी संस्थेबद्दल, विद्यालयाबद्दल, आत्मीयता दाखवून निःस्पृह भावनेने करावे. यावेळी शाळा समिती सदस्या कल्पनाजी वायकर, प्राचार्य विजयकुमार पोकळे, कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष माजी सरपंच शिवाजी खिलारी, पत्रकार बबनराव गायके, ज्येष्ठ शिक्षक बाळासाहेब निवडुंगे, विजया वाव्हळ, आशुतोष वाव्हळ, कांचन वाव्हळ,सेजल गायकवाड, कु.नम्रता बांडे, कु.सायली माकरे यांनी प्राचार्य सुनिल वाव्हळ सर यांना भावी जीवनासाठी आणि कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. प्रसंगी प्राचार्य लक्ष्मण मतकर, संस्थेचे गव्हर्निंग कौन्सिल सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी, पर्यवेक्षक बाळासाहेब खिलारी, खरेदी विक्री संघांचे चेअरमन बाबासाहेब खिलारी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी व्हा.चेअरमन विलासराव झावरे, शिक्षक नेते रावसाहेब रोहकले, मोहन रोकडे, शिक्षक सोसायटी संचालक राजेंद्र कोतकर, महेंद्र हिंगे आणि विजय पठारे तसेच बाबासाहेब दूस, नारायण खिलारी गुरुजी, शिवाजीराव खिलारी, विठ्ठल बांडे गुरुजी, शिवाजी सावंत, बापूसाहेब होळकर, जयवंत पुजारी, सतीश फापाळे, गलांडे सर, उत्तमराव निकम, संतोष इंगळे, बाबाजी शिंदे, केरुभाऊ चत्तर, आदम शेख, साधू भोंडवे, अशोक शेंडगे, आसाराम नलगे, अशोक शेजवळ, बाळासाहेब गायकवाड, बापूसाहेब रांधवण, विनोद गायकवाड, संजय मोरे, वसंत रांधवण, प्रसाद महाराज खिलारी, जनार्दन पठारे, सुरेंद्र पेटकर, शिंदे मॅडम, शिरीष टेकाडे, कैलास मोकळे, सुरेंद्र चव्हाण, नरवटे सर, संतोष व्यवहारे, संदीप खिलारी, सुभाष अडसूळ सर, राहुल नवले, सोनटक्के सर, विजय जाधव, बी. के. झावरे, बोठे सर, दशरथ पवार, सुमन वाव्हळ, कारभारी वाव्हळ, बाळासाहेब वाव्हळ, कचरु वाव्हळ विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, ढोकेश्वर वसतिगृहाचे अधीक्षक सर्व कर्मचारी, सर्व विद्यार्थी, अहिल्यानगर, नेवासा व पारनेर तालुक्यातील अनेक माजी मुख्याध्यापक व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी आणि परिसरातील पालक मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक बाळासाहेब खिलारी यांनी केले, अध्यक्ष निवड प्रा. शिवाजी नरसाळे यांनी केली, सूत्रसंचालन सोनल रोहकले आणि भाऊसाहेब हिंगडे यांनी केले तर आभार रवींद्र मते यांनी मानले.